# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-05.07.2026 वार- रविवार

**महर्षीकर्वे**

महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्त्री शिक्षणाच्या महानकार्याची धुरा पुढे चालवत एसएनडीटी महिला विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि महिला सक्षमीकरण याक्षेत्रांत आदर्श काम केले आहे. देशातील अग्रगण्य विद्यापीठांमध्ये स्थान मिळवण्याची क्षमता या विद्यापीठामध्ये असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल जिष्णु देववर्मा यांनी आज पुण्यात काढले. एनएसडीटी महिला विद्यापीठाच्या १११व्या स्थापनादिना निमित्त भारतरत्न महर्षी कर्वे यांच्या पुतळ्याचं अनावरण राज्यपालांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. याच निमित्ताने इनोव्हेशन महाकुंभच्या दुसऱ्या आवृत्तीचे उद्घाटनही केले. कार्यक्रमाला पुण्यातील मान्यवरांसह विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

**व्हीजीरामजी**

रोजगाराची हमी देणाऱ्या व्हीजीरामजी म्हणजेच विकसित भारतरोजगाक आणि उपजीविका मिशन ग्रामीण योजनेच्या अंमलबजावणी साठी राज्यांना २५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या पहिल्या हप्त्याचं केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते दूरस्थ प्रणालीद्वारे आज वितरण करण्यात आला. या महिन्यापासून ही योजना देशभर लागू झाली आहे.

**अमितशहा जुन्नर**

पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर तालुक्यात बेल्हे इथं पाचशे मेट्रीक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन उद्या केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते दूरस्थ प्रणाली द्वारे होणार आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापन दिना निमित्ताने आणि आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताहाच्या अनुषंगाने हा कार्यक्रम होणार आहे.

**पालिका सीएसआर**

पुणे महापालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ करण्याच्या उद्देशाने, व्यावसायिक सामाजिक जबाबदारी निधी अर्थात सीएसआर प्रभावीपणे आकर्षित करण्यासाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती आणि प्रशासकीय रचना एका महिन्यात पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली आहे. महसूल वाढ समितीच्या नियमित बैठका पुढील आठवड्यापासून सुरु होणार असल्याचंही भिमाले यांनी सांगितलं.

**हिंजवडी मेट्रो**

पुणे मेट्रोच्या हिंजवडी शिवाजीगर मार्गावर अत्याधुनिक थर्डरेल विद्युतीकरण प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. २३ किलोमीटर लांबीच्या यामार्गावर पहिल्यांदाच या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. यामुळे मेट्रोचावीज पुरवठा अधिक कार्यक्षम होणार असून, जलद आणि सुरक्षित सेवा सुनिश्चित होणार आहे.

**उच्चसुरक्षा वाहन क्रमांक**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानसार, नोंदणीकृत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची पाटी बसवणं बंधनकारक असलं तरीही पुण्यात जवळपास साडे चौदा लाख वाहने अजूनही हाय सिक्युरिटी नंबर प्लेटशिवाय असल्याची माहिती वृत्तसंस्थेच्या बातमीत दिली आहे. गेल्या दीड वर्षात सहा वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अनेक वाहनांना अशा पाट्या नाहीत.

त्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्तपणे अशा वाहनांवर दंडात्मक कारवाईसुरू केली असून,अशा वाहनचालकाकडून प्रत्येकी एकहजार रुपयांचा दंड आकारला असल्याचंही वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**पुणे ट्रॅफिक वार्ड़न**

पुण्यात पावसाळ्यात होणारी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठीजुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी १०० प्रशिक्षित वाहतूक वॉर्डन्सची नियुक्ती प्रमुख चौक तसे संवेदनशील ठिकाणी केली जाईल. ही कोंडी टाळण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थापनाला बळकटी देण्यासाठी क्रेडाई आणि पुणे शहर पोलिस यांच्या दरम्यान करार झाला आहे. याचा प्रारंभ नुकताच पोलिस आयुक्त अमितेशकुमार आणि वाहतूक शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांच्या उपस्थित झाला.

**पुणे म्हाडा**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण म्हणजेच म्हाडाच्या पुणे मंडळाकडून आणखी ४ हजार घरांच्या विक्रीची तयारी सुरू केली आहे. या संदर्भात सोडतीची जाहिरात जुलैअखेर प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर ऑनलाइन नोंदणी, अर्जविक्री आणि अर्जस्वीकृतीची प्रक्रिया सुरू होणार आहे अशी माहिती वृत्तसंस्थेच्या बातमीत दिली आहे. या घरांपैकी २० टक्के घरे खासगी विकसकांच्या प्रकल्पांमधील असतील असंही बातमीत नमूद केलं आहे.

**आळंदी रन**

पिंपरी चिंचवड इथल्या धावपटूंनी आळंदी ते पंढरपूर हे २२५किलोमीटर अंतर तीन दिवसांत धावत कापण्याचा शक्ती रन हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. भूषण तारक हा उपक्रम दरवर्षी राबवत असून हे त्याचं पाचवं वर्ष होतं. तीन टप्प्यातल्या या उपक्रमाला शक्ती, भक्ती आणि श्रद्धा अशी नावं दिली होती. यामध्ये १६धावपटूंनी सहभागी होत हा उपक्रम पूर्ण केला.

**पाऊस**

राज्यात मान्सूनची सक्रियता वाढली असून, पुणे शहरासह जिल्ह्यातही पहाटेपासून कधी जोरदार तर कधी संततधार पाऊस सुरू आहे. सामान्य जनजीवनावर त्याचा परिणाम झाला असून, वाहतूक संथगतीने सुरू आहे. दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर आणि नाशिक जिल्ह्यातही जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नागरिकांनी कारणाशिवाय बाहेर पडू नये असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये उद्या संध्याकाळी सहा वाजता. नमस्कार.**